# कार्यालय, शिक्षण विभाग प्राथमिक,
## जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

E-mail Id - mdmabad@gmail.com
Website : https://aurangabadzp.gov.in/
दुरध्वणी क्रमांक - 0240-2329714


जा. क्र.जिपछसं/शिक्षण/प्रावि-3/2025-26/ 7750        दिनांक :- 12 9 SEP 2025

UDISE NO :- 27190219437

वाचा :-

1. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण क्रीडा विभाग शा. नि. क्र.माशाअ 2009/(599/09) माशि-1 दि. 15 नोव्हेंबर, 2011
2. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण क्रीडा विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण-2012/(150)12/माशि-1 दि.16 जुलै, 2013
3. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण क्रीडा विभाग शा. नि. क्र. एचएससी-1811/(431/11)/एसएम-3 दि.04 जून, 2014
4. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण क्रीडा विभाग शा. नि. क्र.धोरण-1014/प्र.क्र.141/एसएम-3 दि. 14 ऑगस्ट, 2014
5. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा. नि.क्र. प्राशाअ/2021/प्र.क्र.17/ एसएम-4 दि. 15 फेब्रुवारी 2021
   महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा.नि.क्र.माशाअ-2022/ प्र.क्र.275/एसएम-4 दि. 06 फेब्रुवारी 2023
7. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे यांचे पत्र क्र. शिसंमा-2023 (एस-7) अनुदान/ माध्य-ब/1053 दि.21.02.2023.
8. मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. माशाअ-2022/ प्र.क्र. 275/ एसएम-4 दि.23 फेब्रुवारी, 2023
9. मा. शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. शिउसं/औ/मावि-1/ अनुदान / 2022-23/1900 दि. 24 फेब्रुवारी, 2023.
10. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा.नि.क्र.प्रामाशा-2025/ प्र.क्र.106/एसएम-4 दि.25 ऑगस्ट, 2025.
11. मा. शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिसं/खाप्राशा/ मुल्यांकन/ 2025/ड 504/03745 दि.29 ऑगस्ट, 2025
12. संच मान्यता शैक्षणिक वर्ष 2024-2025
13. मुख्याध्यापक जयभद्रा प्राथमिक विद्यामंदिर रांजणगांव (शेणपुंजी) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांचा प्रस्ताव दि. 08.09.2025

**-:आदेश :-**

कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या ( इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त ) शासन मान्य खाजगी शाळांना अनुदान मंजुर करणे, अंशत: अनुदान घेत असलेल्या शाळा/तुकडयांना 20% वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषीत प्राथमिक शाळा/वर्ग/ तुकडयांना पात्र घोषीत करुन 20% अनुदान मंजुर करणेबाबत संदर्भिय (1), (2) व (3) चे शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

संदर्भिय क्र. (6) (9) (10) वरील शासन निर्णय / पत्रान्वये अनुदान पात्रतेच्या निकषाची पुर्तता करणाऱ्यां शाळा/ वर्ग/ तुकडयांना अनुदान मंजुर करणे, अंशत: अनुदान घेत असलेल्या शाळा/तुकडयांना वाढीव 20% अनुदानाचा टप्पा व अघोषीत शाळा/वर्ग/तुकडयांना अनुदान निकषाच्या पात्रतेनुसार पात्र करुन शासन स्तरावरुन संदर्भिय 9 व 10 मध्ये नमुद विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदान मंजुर करण्यात आले आहे.

वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार अनुदान मंजुर केलेल्या प्राथमिक शाळा/वर्ग/तुकडी वरील कार्यरत व मान्यता प्राप्त शिक्षकांना दि. 01 ऑगस्ट, 2025 पासून अनुदानाचा टप्पा मंजुर करण्यात येत आहे.

वरील संदर्भिय शासन निर्णय / परिपत्रक/शिक्षण संचालनालय स्तरावरुन मार्गदर्शक सुचना मधील अटी शर्तीची पुर्तता संदर्भिय -13 अन्वये सादर केलेल्या प्रस्तावातील अभिलेख्यांच्या अधीन राहून शाळेस अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

कृ.मा.प.

वरील बाबी विचारात घेवुन या आदेशाद्वारे शासनाने वेळोवेळी शासन निर्णयात अनुदान पात्र घोषीत पदे व सन 2024-25 च्या संच मान्यतेत मंजुर असलेल्या पदां वरील शिक्षकांना (अनुदानास पात्र पदांच्या मर्यादेत) खालील तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे दि. 01 ऑगस्ट, 2025 पासून वेतन अनुदान मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्था व शाळेचे नाव | घोषीत वर्ग / तुकडी | यापूर्वी मंजुर करण्यात आलेला अनुदानाचा टप्पा | 80 टक्के अनुदानास पात्र पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मुळ शासन निर्णयातील व शासन शुध्दीपत्र नुसार अनुदानास पात्र घोषीत पदे | सन 2024-25 च्या संच मान्यतेनुसार मंजुर शिक्षक पदे | अंतिम अनुदानास पात्र पदे |
| 32 | जयभद्रा प्राथमिक विद्यामंदिर रांजणगांव (शेणपुंजी) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (यादी क्र.266 ) | इ. 5 वी ते 7 वी दुसरी तुकडी व इ. 1 ली ते 7 वी तिसरी तुकडी | 60 टक्के अनुदान | 12 | 24 | 12 |

वरील प्रमाणे मंजुर करण्यात आलेले अनुदान संस्थेने / मुख्याध्यापक यांनी सादर केलेल्या अभिलेख्यांच्या अधीन राहून मंजुर करण्यात येत आहे. यामध्ये भविष्यात कोणतीही तफावत आढळून आल्यास अथवा तक्रार प्राप्त झाल्यास शाळेस दिलेले अनुदान काढून घेण्याबाबत कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जयश्री चव्हाण)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी-

1. मा. शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.
2. अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर यांना देवुन कळविण्यात येते की, संबधित कर्मचाऱ्यांचे वेतन अदा होईल याची दक्षता घ्यावी.
3. मुख्याध्यापक जयभद्रा प्राथमिक विद्यामंदिर रांजणगांव (शेणपुंजी) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांना देवुन कळविण्यात येते की, आपल्या शळेतील शिक्षकांचे वेतन देयके अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर कार्यालयास सादर करावीत.